FYBA Sem : II 10/8/15
L-II Marathi

N03AAM

प्र.५ अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही पाच) (१०)

१) आधुनिक मराठी नवकवितेचे जनक कोणाला म्हंटले जाते ?

२) केशवसुतांचे संपूर्ण नाव काय ?

३) 'मृण्मयी' ही कविता कोणी लिहीली आहे ?

४) 'कोलंबसाचे गर्वगीत' या कवितेतील नायक कशामधून प्रवास करीत आहे ?

५) 'माझ्यातून' ही कविता कोणी लिहिली आहे ?

६) त्र्यंबक बापूजी ठोमरे यांचे टोपणनाव लिहा.

७) 'जीवन त्यांना कळले हो' ही कविता कोणी लिहिली आहे ?

८) 'कालचा पाऊस' या कवितेतील कवीने पीक कश्यावर काढले आहे.

ब) खालील बहुपर्यायी प्रश्नांची अचूक उत्तरे लिहा. (५)

१) जाहिरातीचा मथळा म्हणजे जाहिरातीचे .............. होय.
अ) शीर्षक ब) उत्पादन क) विक्री

२) जाहिरातीचे प्रभावी माध्यम .............. आहे.
अ) वर्तमानपत्र ब) दूरदर्शन क) आकाशवाणी

३) जाहिरातीच्या मसुद्यात .............. हा घटक महत्वाचा असतो.
अ) लिखित मजकूर ब) चित्रे क) ध्वनी

४) दूरदर्शनवरुन प्रदर्शित होणाऱ्या जाहिरातीत.................. ला महत्व असते.
अ) उत्पादन ब) मथळा क) चलत्-चित्र

५) टिप्पणी लिहिताना प्रत्येक मुद्द्याचा स्वतंत्र ................ असावा.
अ) परिच्छेद ब) वाक्यरचना क) संदर्भ

❀ ❀ ❀

N03AAM

वेळ : २.३० तास गुण : ७५

प्र.१ अ) "सामाजिक बांधिलकी हा 'कविता शतकाची' या काव्यसंग्रहातील कवितांचा मुख्य गाभा आहे" तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा. (१५)

किंवा

ब) मानवी जीवनातील विसंगती, अन्याय आणि यातनांचा आविष्कार 'कविता शतकाची' या काव्यसंग्रहात कवींनी कसा केला आहे, ते तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा.

प्र.२ "स्त्रीला आलेली अस्तित्त्वाची जाग 'कविता शतकाची' या काव्यसंग्रहातील कवितांतून व्यक्त होते" तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे सविस्तर लिहा. (१५)

किंवा

"दलितांच्या दु:स्थितीबद्दलचा संताप आणि परंपरेबद्दलची चिड ही दलित कवितेची वैशिष्ट्ये आहेत" तुम्ही अभ्यासलेल्या कवितांच्या आधारे चर्चा करा.

प्र.३ अ) गुरुकृपा को. ऑप. हौ. सोसायटीच्या वार्षिक सभेचे इतिवृत्त लिहा. (८)

ब) कल्याण येथे भरलेल्या ग्रंथ प्रदर्शनाची वर्तमानपत्रासाठी जाहिरात तयार करा. (७)

प्र.४ अ) मुंबई महानगरपालिकेतील वरिष्ठ लिपिक सौ. अनुराधा शहा यांना त्यांच्या उजव्या डोळ्यावरील शस्त्रक्रियेसाठी तीन दिवसांची भरपगारी रजा हवी आहे. गेली चाळीस वर्षे सौ. शहा मुंबई महापालिकेच्या सेवेत कायमस्वरुपी आहेत. त्यांची बारा दिवसांची भरपगारी रजा शिल्लक आहे. या माहितीच्या आधारे वरिष्ठांना सादर करावयाची कार्यालयीन टिप्पणी लिहा. (८)

ब) खालील उताऱ्याचा सुमारे एक तृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दात लिहा. (७)

खरं तर आयुष्यात प्रत्येक व्यक्ती कोणाचा ना कोणाचा आधार शोधत असते, मार्गदर्शन मिळवत असते, त्यात आई, वडील, शिक्षक, मित्र, मैत्रीण, काका, मामा वा एखादा बुवा वा बाईही असू शकते. उद्योजकतेच्या क्षेत्राच्या संदर्भात पाहिलतं तर, Mentor (गुरु) हा शब्द ग्रीक पुराण कथांमधून आलेला आहे. गुरु म्हणजे अशी व्यक्ती जिच्यावर आपण पूर्ण भरवसा आणि श्रध्दा ठेवू शकतो आणि वेळोवेळी त्यांच्या मार्गदर्शनाची अपेक्षा ठेवू शकतो. पूर्वीच्या काळी आई-वडील गुरुजनांकडे मुलांना विद्याभ्यासासाठी पाठवीत. आता काळ बदलला, तरीही मी म्हणेन उद्योग-व्यवसायासाठी गुरु-शिष्य परंपरा फार मोलाची ठरते. कठीण प्रसंगी गुरुसोबत असणं फार महत्वाचं असतं.

(मागे पहा)